**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक:- १७/०९/२०१८

## येवल्यातील सिध्दिविनायक गणपती मंदिरातील दानपेटी चोरणारे सराईत चोरटे स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

दिनांक १२/०९/२०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास येवला शहरात मेनरोड परिसरातील सिध्दिविनायक गणपती मंदिराचे कम्पाउंडचे गेटचे कुलूप तोडुन सभामंडपातील दानपेटी अज्ञात आरोपीतांनी चोरी करून नेली होती. सदर बाबत येवला शहर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. १३६/२०१८ प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. ऐन गणेशोत्सवाचे काळात मंदिरामध्ये चोरी झाल्यामुळे भाविकांमध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले होते.

सदर बाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व **अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. निलोत्पल सो.** यांनी तात्काळ दखल घेवुन सदर चोरीतील अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकासह येवला, मनमाड, नांदगाव तसेच आजुबाजूचे परिसरातील सराईत गुन्हेगारांची माहिती घेवुन सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला. आज रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी येवला तालुका परिसरात सदर आरोपीतांचा शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त बातमीचे आधारे पथकाने येवला शहर परिसरातुन संशयीत नामे **१) मिलिंद उर्फ मन्या मगन खंडीझोड,** वय २८, रा. आंगणगाव, ता.येवला, जि.नाशिक यास शिताफिने ताब्यात घेतले. त्यास पोलीस खाकी दाखविताच त्याने त्याचे साथीदार नामे **२) सागर गुलाब पवार,** वय २५, रा. पारेगाव रोड, येवला, ता.येवला व **३) शंकर नामदेव राखपसरे,** वय २८, रा. आंगणगाव, ता.येवला यांचेसह गेल्या हप्त्यात येवला मेनरोड परिसरातील सिध्दीविनायक गणपती मंदिरातील दानपेटी चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. वरील आरोपी नामे **मिलींद उर्फ मन्या** याचे **कब्जातुन चोरीस गेलेली दानपेटी व रोख रक्कम हस्तगत** करण्यात आली आहे. सदर आरोपीचे साथीदार सागर पवार व शंकर नामदेव राखपसरे यांना येवला शहरातुन ताब्यात घेण्यात आले असुन सदर आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली **लाल रंगाची बजाज पल्सर मोटर सायकल** एम.एच.१५.डी.जे.५६८७ जप्त करण्यात आली आहे.

ताब्यात घेतलेला **आरोपी नामे सागर गुलाब पवार** हा सराईत गुन्हेगार असुन त्याने अलीकडेच त्याची गॅंग तयार केली होती. त्याचेविरूध्द यापुर्वी घरफोडी, मोटर सायकल चोरी असे एकुण ०९ मालाविरूध्दचे गंभीर गुन्हे दाखल आहे. वरील गुन्हयाचे समांतर तपासात सदर आरोपीतांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री.संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. निलोत्पल सो.**यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोउनि स्वप्निल नाईक, पोहवा शांताराम घुगे, पोना रावसाहेब कांबळे, भरत कांदळकर, पोकॉ प्रविण काकड, भाउसाहेब टिळे, इम्रान पटेल यांचे पथकाने सदर कारवाई करून आरोपीतांना ताब्यात घेतले आहे.